# दि. २३/०२/२०२० रोजीच्या आमसभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई ची ५८ वी आमसभा **रविवार** दि. २३/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वा. ठिकाण **''माँ वैष्णवी पॅलेस'' एम.आय.डी.सी. रोड, बीड** या ठिकाणी अध्यक्ष प्रकाश भिमराज कराळे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सर्व कार्यकारणीचे स्वागत समितीने स्वागत केल्यानंतर सभेचे कामकाज सुरु झाले. प्रारंभी सर्व सभासदांना संघटनेचा ५८ वा अहवाल व सभेची नोटिस आर्थिक पत्रके वाटप करण्यात आली. तदनंतर संघटनेचे जनरल सेक्रेटरी हेमंत ढमढेरे यांनी परीक्षा सचिव अभिलाषा नाईक यांना अहवाल वाचन करण्याची अनुमती दिली त्याप्रमाणे सौ. अभिलाषा नाईक यांनी ५८ व्या आमसभेच्या प्रारंभी दिवंगतांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा ठराव वाचुन दाखविला. सर्व सभासदांनी २ मिनेट उभे राहून दिवंगतांना श्रध्दांजली अपर्ण केली. तदनंतर अध्यक्षांचे परवानगीने सभेचे विषय पत्रिके प्रमाणे सभेचे कामकाज सुरु करणेत आले.

**विषय नं. १ संघटनेच्या ५८ व्या आमसभेचे विषयपत्रिकेचे वाचन करणे.**

**ठराव क्र. १** संघटनेच्या ५८ व्या वार्षिक आमसभेचे आयोजन ''माँ वैष्णवी पॅलेस''एम.आय.डी.सी.रोड, बीड येथे करण्यात आले. त्या अनुषंगाने आमसभेतील १ ते ११ विषयांचे वाचन करण्याची सुचना अध्यक्षांनी केली. त्यानुसार जनरल सेक्रेटरी श्री. हेमंत ढमढेरे यांनी वार्षिक सभेतील १ ते ११ विषयांचे वाचन केले. याप्रमाणे अहवालात नमुद केलेली आमसभेची नोटीस स्विकारण्यात येऊन सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

**सुचक : श्री. प्रकाश कराळे**
**अनुमोदक : श्री. प्रकाश रेळेकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं. २ संघटनेच्या २८ जानेवारी २०१९ रोजी झालेल्या ५७ व्या आमसभेचे इतिवृत्त कायम करणे.**

**ठराव क्र. २** संघटनेची मागील आमसभा दि.२८/१/२०१९ रोजी झालेल्या आमसभेतील विषयांचे वाचन केले. त्यावर झालेल्या ठरावाच्या इतिवृत्ताचे वाचन केले. त्याप्रमाणे सदरचे इतिवृत्त सभेतील चर्चेनुसार बरोबर लिहिले असल्याने आजच्या सभेत वाचून कायम करण्यात येवून ठराव मंजर करण्यात आला. सभेत सभासदांनी ५८ वा अहवाल अत्यंत चांगला झाल्याचे भावना व्यक्त करुन ठराव मंजुर करण्यात आला.

**सुचक : सौ. उषा जाधव**
**अनुमोदक : श्री. उत्कर्ष गवते**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं. ३ सन २०१९-२०२० च्या अहवालाची नोंद घेणे.**

**ठराव क्र. ३** सन २०१९-२० या वर्षात संघटनेने केलेल्या कामाचा अहवाल, आमसभा नोटिस व आर्थिक पत्रके प्रसिध्द करण्यात येऊन सर्व सभासदांना वितरीत करण्यात आले. संघटनेचे जनरल सेक्रेटरी श्री. हेमंत ढमढेरे यांनी सभेत अहवालाचे वाचन करुन उपस्थित सभासदांना संघटनेच्या व सभासदांच्या हितासाठी केलेल्या सर्व कार्याची इतंभूत माहिती अहवालात दिली असल्याने सर्व सभासदांनी त्याचे स्वागत केले. संघटनेचे आजीव सभासद तसेच नवीन झालेले आजीव सभासदांची संख्या, परीक्षा विभागाचे कामकाज, परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांची जिल्हा निहाय संख्या इ. संघटनेने केलेल्या कामाचा गोषवारा सादर करण्यात आला. संघटनेची सांपत्तिक स्थिती, बँकखात्याची माहिती तसेच संघटनेने शासनाकडे सादर केलेल्या विविध मागण्यांची संपूर्ण माहिती अहवालातून प्रसिध्द केली आहे. सभेमध्ये अहवालाची नोंद घेऊन सभासदांनी अभिनंदन करुन ठराव मंजुर करण्यात आला.

**सुचक : श्री. सुरेश देवरे**
**अनुमोदक : श्री. सुभाष नाईकवाडे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.४** **मा. चार्टर्ड अकौंटंट यांचेकडून प्रमाणित झालेले असोसिएशनचे ३१/३/२०१९ अखेरच्या आर्थिक पत्रकांना मान्यता देणे.**

**ठराव क्र.४** संघटनेचे दि. ३१/३/२०१९ चे आर्थिक पत्रके मा. चार्टर्ड अकौंटंट श्री.अभय कटारिया यांनी लेखापरीक्षण करुन प्रमाणित होऊन प्राप्त झालेले आर्थिक पत्रके आमसभेत कोषाध्यक्ष श्री. सुभाष बागड यांनी वाचून दाखविले. सदरच्या आर्थिक पत्रकांवर सभेत चर्चा होऊन संघटनेची आर्थिक स्थिती, बँक खात्यांतील शिल्लक, मुदत ठेवी आदिंची माहिती सादर केली गेली. संघटनेची सांपत्तिक स्थिती दिवसेंदिवस चांगली होत असल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.सादर केलेले नफा-तोटा व ताळेबंद पत्रके मंजुर करण्यात आले. कोषाध्यक्ष सुभाष बागड यांचे अभिनंदन करण्यात येवुन ठराव मंजुर करण्यात आला.

**सुचक : श्री. जे.के. वाघमारे**
**अनुमोदक : श्री. अरुण चव्हाण**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.५** **शासनाकडील व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडील माण्याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.५** शासनाकडील व परीक्षा परिषदेकडील व त्याच बरोबर इतर विभागाकडील सादर करण्यात आलेल्या पुढिल मागण्या सोडविण्याकामी राज्य कार्यकारणी सदस्यांनी प्रयत्न करावे असे ठरले.

**राज्य परिषदेकडील मागण्या :-** १) शासनाकडील १ ते १३ मागण्याबाबतचे प्रस्ताव त्वरीत सादर करणे. २) GCC-TBC परीक्षा गुणवत्ता सुधारण्याकामी सुधारीत गुणदान पध्दत व ४० % पासिंग पध्दत लागू करणे.(खानविलकर समिती अहवाल) ३) संगणक टंकलेखन पध्दतीने लघुलेखनाच्या ऑनलाईन नुतनीकरण मान्यता देणे. ४)स्पेशल स्किल ५० श.प्र.मि. अभ्यासक्रम ६ महिने मुदतीचा करुन सुधारीत पूर्वअटीचा शासन आदेश निर्गमित करणे. ५) टंकलेखन, संगणक टंकलेखन परीक्षेचा निकाल ३० दिवसांत जाहीर करणे. ६)मान्यता नुतनीकरण व संकेत स्थळावर अपलोड झालेली डॉक्युमेंट संस्था लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देणे. (ऑनलाईन पत्रव्यवहाराची इंतभूत माहिती लॉगीनमध्ये उपलब्ध करणे). ७)प्राश्निक,समिक्षक,परिक्षक यांचे मानधन वाढविणे व प्राचार्य यांना वर्ग १ व वर्ग २ प्रमाणे प्रवासभत्ता देणे. ८) शासनाने मंजुर केलेल्या अभ्यासक्रम पुस्तिकेतीलच वस्तुनिष्ठ प्रश्न संगणक टंकलेखन परीक्षेसाठी निवडणे याकामी प्राधान्याने शासनमान्य संस्थांचे संस्थाप्रमुख,प्राचार्य व निदेशक यांची नियुक्ती करणे.९) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या जीसीसी, जीसीसी-टिबीसी परीक्षेचे वार्षिक वेळापत्रक जाहिर करणे (संगणक टंकलेखन परीक्षेचे सत्र बदल करणे) १०) टंकलेखन,लघुलेखन, संगणक टंकलेखन अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा १ महिन्यात घेणे. ११) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेत स्थळावर अपलोड केलेल्या सर्व बाबींची प्रिंट सुविधा उपलब्ध करुन देणे. १२) GCC,GCC-TBC परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे आधारकार्ड व विद्यार्थी यादी मागणी केलेल्या संस्थेस ईमेलव्दारे उपलब्ध करुन देणे. (अनाधिकृत विद्यार्थ्यांचा शोध घेऊन प्रतिबंध करणेकामी) १३) GCC, GCC-TBC पारदर्शक परीक्षेसाठी समिती गठित करुन उपाय योजना करणे.

**शासनाकडील मागण्या :-** १) जीसीसी-टिबीसी अभ्यासक्रमाची सुधारीत गुणदान पध्दत लागू करणे (खानविलकर समिती अहवाल मान्य करणे ) २)महाराष्ट्र शासनाच्या शासकिय व निमशासकिय विभागांच्या नोकरभरतीच्या जाहिरातीत लिपीक /टंकलेखक पदासाठी राजपत्र व संगणक अर्हता आदेशातील MSCE, PUNE या GCC-TBC (संगणक टंकलेखन) अभ्यासक्रमाचा उल्लेख सक्तीचा करणे. ३)महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संगणक टंकलेखन अभ्यासक्रमाचे शासन आदेश ३१ ऑक्टो. २०१३ मधील अभ्यासक्रमानुसार पुस्तक निर्गमीत करणे. ४) संगणक अभ्यासक्रम स्पेशल स्किल ५० श.प्र.मि. ६ महिने कालावधीचा करण्यात येवून उच्च गतीच्या लघुलेखन परीक्षेस मॅन्युअल प्रमाणे पुर्व अट लागु करणे. ५) शासनाच्या मेगा भरती अथवा नियमित भरती प्रक्रियेत संगणक

चाचणी (गती परीक्षा ) सक्तीची करणे. ६) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अशासकीय मंडळात वाणिज्य संस्थांचे प्रतिनिधी प्राधान्याने नियुक्ती करणे. ७) राज्यातील प्राथमिक शिक्षकांना जीसीसी-टिबीसी संगणक टंकलेखन परीक्षा बंधनकारक करणे. (संगणक टंकलेखन अभ्यासक्रमात मांडणी व गतीला प्राधान्य असल्याने व हा उपक्रम शासनाचा असल्याने ) ८) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या स्तरावर टंकलेखन, लघुलेखन, संगणक टंकलेखन समित्या गठित करणेकामी शासन आदेश निर्गमीत करणे. ९) महाराष्ट्र राज्यातील वाणिज्य शिक्षण संस्थांसाठी स्वतंत्र विधान परिषद मतदार संघ तयार करणे. १०) सुधारीत यिमावलीतील १९९१-२०१४-२०१६ टंकलेखन, लघुलेखन स्पेशल स्किल व संगणक टंकलेखन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण शुल्क वाढीस मान्यता देणे. ११) शासन स्तरावरुन परिक्षा परिषदेच्या ऑनलाईन परीक्षेचा डेमो उपलब्ध करुन देणे. १२) संगणक टंकलेखन परीक्षेसाठी प्राधान्याने परीक्षा केंद्र उपलब्ध करुन देणे. १३) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अभ्यासक्रमास पुरेसे विद्यार्थी उपलब्ध होत नसल्याने नविन संस्थाना मान्यता देण्यात येऊ नये.

**इतर मागण्या :-** १) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक न्यास विभाग व शासकिय महामंडळाकडुन प्रशिक्षण दिले जाते. त्यात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचा लिपिक टंकलेखक पात्रता व संगणक अर्हता असलेला गर्व्हनमेंट सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर टायपींग बेसिक कोर्स समावेश करणे. २) सामाजिक न्याय विभाग व इतर विभागाच्या प्रशिक्षणात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या शासन नियंत्रीत स्वायत्त संस्थेकडून घेण्यात येणा-या या टंकलेखन लघुलेखन प्रशिक्षणाचा सामावेश करणे.

**सुचक : श्री. संजय कांबळे**
**अनुमोदक : श्री. गिरीश टिबे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.६** **SSD स्पेशल स्किल ५० शब्द प्र.मि.अभ्यासक्रम ६ महिने मुदतीचा करणे व पुर्व अट लागू करणे. मॅन्युअल पध्दतीने बॅलन्स सिट, नोटिस व स्पीड सह.**

**ठराव क्र.६** शासनाने ३१ ऑक्टोबर २०१३ शासन आदेशनुसार संगणक टंकलेखन (जीसीसी-टिबीसी) गर्व्हनमेंट सर्टिफिकेट कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी / मराठी / हिंदी ३०,४० श.प्र.मि. या ६ महिनेच्या मुदतीच्या अभ्यासक्रमास मान्यता दिलेली असुन सोबत मॅन्युअल टंकलेखन ३०,४० श.प्र.मि. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस पुन्हा जीसीसी-टिबीसी ३०,४० श.प्र.मि. कोर्स करावयाची आवश्यकता नको म्हणुन स्पेशल स्किल ५० श.प्र.मि. हा तिन महिन्याचा अभ्यासक्रमही मान्यता दिलेली आहे. मात्र सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाने संगणक अर्हता दिलेल्या शासन आदेश दि.१६ जुलै २०१८ मध्ये ** हा तीन महिन्याचा कोर्स असल्याने त्यास संगणक अर्हता दिलेली नाही. तसेच शालेय शिक्षण क्रिडा विभागाने अभ्यासक्रमाच्या अटी शर्ती मध्ये सुध्दा या अभ्यासक्रमाला स्थान दिलेले नाही. वास्तविक पाहता मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रमात ५० श.प्र.मि. विशयास अत्यंत महत्व होते. लघुलेखनाच्या उच्च गतीसाठी पुर्व अटीत समावेश करण्यात आलेला होता त्यामुळे लघुलेखन १००,१२०,१५० श.प्र.मि. साठी मॅन्युअल टायपींग जीसीसी ५० श.प्र.मि. पुर्व अट लागु होती, त्याच धर्तीवर ** स्पेशल स्किल संगणक टंकलेखन ५० श.प्र.मि. हा अभ्यासक्रम ६ महिने मुदतीचा करण्यात येवुन शासन आदेशाच्या पुर्वीच्या अटी शर्ती प्रमाणे उच्च गती लघुलेखन अभ्यासक्रमास पुर्व अट व जिथे मॅन्युअल इंग्रजी ५०,६० श.प्र.मि. अटी लागु होत्या त्या ठिकाणी संगणक टंकलेखन जीसीसी-टिबीसी ५० श.प्र.मि. प्रमाणे गर्व्हनमेंट सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर टायपिंग ५० श.प्र.मि. अशी दुरुस्ती करुन शासन आदेश ५ डिसेंबर २०१६ दुरुती करणेकामी शासकिय व परीक्षा परिषदेस विनंती करण्यात यावी असा ठराव मंजूर करण्यात आला.

**सुचक : श्री. गोपिनाथ निरभवणे**
**अनुमोदक : श्री. जीवन थेटे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.७** **आजीवन सभासद संस्था ज्या विदर्थी अभावी १० वर्षापुर्वी बंद झालेल्या आहेत अशा संस्थांना पुर्नजीवीत करुन नुतनीकरण देवुन संगणक मान्यता देणे.**

**ठराव क्र.७** श्री. रामभाऊ कोरडे-राजकमल कॉम्प्यु.टाईपरायटिंग इन्स्टि.,नरखेड,नागपुर यांनी दि.२०/२/२०२० रोजीचे पत्राने आमसभेतील विषय क्र. ७ संदर्भात १० वर्षापुर्वी बंद झालेल्या संस्थाचे पुर्नजिवन संदर्भात ६ बाबी निदर्शणास आणुन दिलेल्या आहेत. त्या पुढिल प्रमाणे विद्यमान संस्थेला बाधा ठरणार नाही, एकमेसीएल च्या संचालक धारकांना चालविणेस प्रतिबंध असावा, ज्या ठिकाणी संस्था कार्यरत आहेत व त्या संस्थेला ज्यामुळे स्पर्धा निर्माण होत असेल तर बंद पडलेली संस्था चालु करण्यात येऊ नये. ग्रामीण क्षेत्राकरिता विदयमान संस्थेपासुन कमीत कमी १० कि.मी. असावे. अशा काही महत्वाच्या बाबी मांडण्यात आलेल्या आहेत. या आमसभेच्या विषय क्र. ७ संदर्भात चर्चा करणेत आली. हा विषय आमसभेत घेण्याचे कारण अध्यक्षांनी नमुद केले की अनेक बंद संस्थांची मागणी आहे. आमच्या संस्था सुरु कराव्यात शिवाय शासन स्तरावर नविन संस्था सुरु होणेकामी काहीजण पत्रव्यवहार करत आहेत. त्यामुळे नविन संस्था सुरु होणार असल्यास विदयार्थी अभावी संघटनेस योगदान देणा-या १० वर्षापुर्वी बंद झालेल्या संस्था प्रथम सुरु व्हाव्यात असा आग्रह संघटनेचा असावा म्हणुन विषय घेण्यात आलेला असल्याचे अध्यक्षांनी सांगितले. यावर सभेत चर्चा झाली. संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष दिनेश पोरे व काही सदस्यांनी जुन्या संस्था सुरु करणेस विरोध दर्शविला कारण ज्या संस्था बंद झाल्या त्या कार्यक्षेत्रात नविन संस्था सुरु झालेल्या असुन नियमावलीचे पालन होणार नाही म्हणुन आमसभेत विषय क्र. ७ हा चर्चेला न घेता स्थगित ठेवणेत यावा असे ठरले व ठराव मंजुर करणेत आला.

**सुचक : श्री. योगेश सोन्ने**
**अनुमोदक : श्री. दिनेश पोरे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.७** **सन २०२०-२०२१ या वर्षातील कामकाजाची रुपरेषा ठरविणे.**

**ठराव क्र.७** आजच्या सभेत सन २०२०-२१ यावर्षाची रुपरेषा ठरविणेबाबत सभेत चर्चा करुन रुपरेषा ठरविण्यात आली. १)असोसिएशनचे सभासद वाढविणेसाठी प्रयत्न करणे. २)संघटनेच्या स्तरावर जीसीसी, जीसीसी-टिबीसी सराव परीक्षांसाठी प्रत्येक जिल्हयातून विद्यार्थी संख्य वाढविणेबाबत प्रयत्न करणे. ३) अधिवेशनात सादर करण्यात आलेल्या मागण्यांचा पाठपुरावा करणे. ४)पारदर्शक परीक्षा पध्दतीकामी उपाय योजना करणे. ४) अधिवेशनातील लघुलेखन चर्चासत्रात मांडण्यात आलेल्या उपाय व योजना संभाव्य बदल शुल्कवाढ, परीक्षा व मुल्यमापन पध्दती सुधारणांबाबत परीक्षा परिषद व शासन स्तरावर प्रयत्न करणे. वरीलप्रमाणे रुपरेषा ठरविण्यात आली त्यास सर्व सभासदांनी मंजुरी देऊन ठराव संमत करण्यात आला.

**सुचक : श्री. अलोक आव्हाड**
**अनुमोदक : श्री. भागवत ढाकणे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.८** **संघटनेची प्रोसेसिंग फी, रॉयल्टी फी ची नोंद घेणे.**

**ठराव क्र.८** संघटनेच्या सतरावर उत्पन्नाचे साधन म्हणून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करावयाच्या खर्चासाठी संघटनेकडे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात एकूण प्रोसेसिंग फी २९,४००/- जमा झाली. सदरची रक्कम संघटनेच्या आर्थिक पत्रकात नमुद करण्यात आली असून उर्वरीत संस्थांनी प्रोसेसिंग फि भरणा करुन सहकार्य करावे असे ठरले व ठराव मंजूर करण्यात आला.

**सुचक : श्री. रवि देशमुख**
**अनुमोदक : श्री. नानासाहेब दराडे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.९** **सुधारित नियमावलीचे पालन न करणा-या संस्थेचे सभासदत्व रद्द करणेबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र.९** संघटनेच्या आजीव सभासद संस्था या शासनमान्यता प्राप्त टंकलेखन लघुलेखन व संगणक टंकलेखन संस्था असून या संस्थांच्या दैनदिन कामकाज, दैनंदिन नियंत्रण, संस्था मान्यतेचे उद्देश, विद्यार्थ्यांचे वाणिज्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम परीक्षा पात्रता अशा असंख्या बाबींचा सामावेश असलेली सुधारीत नियमावली १९९१-२०१४-२०१६ शासनाने निर्गमित केलेली आहे त्याचबरोबर नियमावलीचे पालन करणेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाचे आदेश आहेत. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणेबाबत शासनाच्या शालेय शिक्षण क्रिडा विभागाने परिपत्रकाव्दारे शासन आदेश निर्गमित करुन नियमावलीचे पालन करणेबाबत शिक्षणाधिकारी माध्यमिक व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना अधिकार प्रदान केले आहेत. मात्र राज्यातील अनेक आजीव सभासद संस्था या अनाधिकृत विद्यार्थी बसविणे, अनधिकृत स्थलांतर करणे अथवा नियमावलीतील अटी शर्तींचा भंग करुन इतर सभासद संस्थावर अन्याय करत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असतात अशा तक्रारीवर शिक्षणाधिकारी माध्यमिक व शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून वेळेत कार्यवाही होत नाही त्यामुळे गैरप्रकार वाढीस लागत आहे. याकामी जिल्हा समिती व जिल्हा प्रतिनिधी यांचेकडून तक्रार प्राप्त झाल्यास त्याची शहानिशा करुन गैरप्रकार करणा-या संस्था, नियमावलीचे पालन न करणा-या संस्था बाबत संघटनेकडे तक्रार प्राप्त झाल्यास सदर संस्थेचे संघटनेचे लॉगिन ब्लॉक करण्यात यावेत त्याचबरोबर सदर संस्थेचा तपासणी अहवाल व कार्यवाही आदेश प्राप्त होताच संस्थेचे सभासदत्व रदद करण्यात यावे असे आजच्या सभेत ठरले व ठराव मंजूर करण्यात आला.

**सुचक : श्री. निलेश वाटवे**
**अनुमोदक : सौ. शारदा जगदाळे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.१०** **मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.१०** उपस्थित सभासदांना या विषयांतर्गत सभेचे अध्यक्ष यांनी काही विषय असल्यास मांडण्याची सुचना केली त्याप्रमाणे सभासद श्री. सोमनाथ कोलते यांनी १) ५९ वे अधिवेशन औरंगाबाद येथे घेण्यात यावे. २) परीक्षा सेंटर निवडीचे प्रक्रियेत जिल्हा अध्यक्ष व जिल्हा प्रतिनिधी यांना विश्वासत घेण्यात यावे. ३) परीक्षा केंद्र प्रत्येक तालुक्यात देण्यात यावे. ४) परीक्षा ही ऑक्टोबर / नोंव्हेंबर दिपावलीच्या सुट्टीत व एप्रिल / मे उन्हाळयाच्या सुट्टीत घेण्यात यावी. ५) औरंगाबाद जिल्हा संघटनेचे सलग्नता रद्द केल्यामुळे काही प्रश्न उपस्थित केले. या सर्व प्रश्नांवर अध्यक्ष यांनी सभेत सांगितले की, अ.क्र. १ संघटनेचे अधिवेशन औरंगाबादला घेणेबाबत पुढिल वर्षी राज्यकार्यकारणी नक्कीच प्रयत्न करेल. मात्र या कामी निवडणुन आलेल्या जिल्हा प्रतिनिधींची सहमती लागेल. २) परीक्षा सेंटर निवडीबाबत जिल्हा अध्यक्ष व जिल्हा प्रतिनिधी यांना विश्वासात घेणेबाबत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांना कळविण्यात येईल व तसा आग्रह धरण्यात येईल. अ.क्र. ३) परीक्षा केंद्र प्रत्येक तालुक्यास देणेबाबत राज्यसंघटनाच आग्रही असून या कामी पाठपुरावा करेल. अ.क्र.४) परीक्षा ही ऑक्टो./नोव्हेंबर किंवा एप्रिल/मे सुट्टित घेणेकामी परीक्षा परिषदेला कळविण्यात येईल मात्र याकामी सुधारीत नियमावली मध्ये दुरुस्ती करणे गरजेचे राहिल सुधारीत नियमावलीस शासनाने मान्यता दिल्यास परिक्षा सुट्टिच्या कालावधीत घेणे शक्य होईल म्हणुन आवश्य प्रयत्न केला जाईल. अ.क्र.५) औरंगाबाद जिल्हा संघटनेची सलग्नता रद्द करणेबाबत विचारलेल्या प्रश्नाबाबत अध्यक्ष यांनी सांगितले की, राज्य संघटनेच्या प्रत्येक जिल्हयातील जिल्हा स्तरावर जिल्हा समित्या, विभागीय समित्या गठित करणेबाबतचे परीक्षा परिषदेचे आदेश आहेत किंबहुना तसे शासनाने परिपत्रक निर्गमित केलेले आहे. अशा समित्या मध्ये निवडून आलेले राज्य कार्यकारणी सदस्य, जिल्हा संघटना अध्यक्ष व जिल्हा संघटना सचिव यांचा सामावेश राहिल अशी तरतुद आहे. मात्र अनेक जिल्ह्यात नोंदणीकृत संघटना कार्यरत नाही तसेच संघटना नोंदणी करणेबाबत सुचना देवुनही संघटना नोंदणी केल्या नाहीत म्हणून समित्या गठित करणेस अडचणी नको जिल्ह्यामध्ये आजीव सभासदांमध्ये समन्वय असावा म्हणून सलग्न संघटना तयार करुन सलग्न संघटना नियमावली तयार करुन त्यास मागील वार्षिक सभेने मान्यता दिलेली आहे. अशा पध्दतीने राज्यात सलग्न संघटना कार्यरत आहेत मात्र औरंगाबाद संघटनेचे सलग्न संघटनेचे

सचिव यांनी राज्य संघटना अध्यक्ष यांचेवर आरोप प्रत्यारोप करुन सोशल मिडियावर राज्य संघटना अध्यक्षांची राजीनाम्याची मागणी केली हि बाब राज्य कार्यकारी समितीने ठरावा व्दारे अमान्य करुन सलग्नता रद्द करण्याचा बहुमताने ठराव मंजूर केल्याने सलग्नता रद्द करण्याचे सांगण्यात आले व यापुढे निवडून आलेले जिल्हा प्रतिनिधी यांनी शिफारस केल्यास अथवा जिल्हयातील आजीव सभासदापैकी ५० टक्के सभासदांनी लेखी मागणी केल्यास पुन्हा सलग्नता देण्यात येईल मात्र पुन्हा नव्याने निवडणुक कार्यक्रम घेवून लोकशाही पध्दतीने कार्यकारणी निवड करण्यात येईल असे सुचविले व ठराव मंजूर करण्यात आला.

**सुचक : श्री. सोमनाथ कोलते**
**अनुमोदक : श्री. जालिंदर चौरे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव क्र. १०/१** आभार दर्शक ठराव मंजूर करणे

संघटनेचे ५८ वे राज्यस्तरीय अधिवेशन बीड जिल्हा संघटनेने अतिशय कमी वेळेत अप्रतिम पार पाडल्याबद्दल आभार दर्शक ठराव संघटनेचे जेष्ठ सल्लगार गोवर्धन विरकुंवर यांनी मांडला. या ठरावाच्या अनुशंगाने ५८ वे अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष प्रदिप कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष सुभाष नाईकवाडे, जिल्हा सचिव अरुण नाळपे, कार्याध्यक्ष सुर्यकांत रुद्रकंठवार, उपाध्यक्ष वसंतराव गुप्ते, रंगनाथ देशमाने, कोषाध्यक्ष भागवत ढाकणे व सर्व जिल्हा समितीने ५८ व्या व्दि दिवसीय अधिवेशन घेण्याचा आग्रह केला आणि तो पुर्णत्वास नेला उत्कृष्ट असा हॉल, मंडप, भव्य स्टॉल, स्नेह भोजन व निवास व्यवस्था व आदरातिथ्य केल्याबद्दल आयोजकांचे आभार मानून अभिनंदन ठराव मंजूर करण्यात आला. अधिवेशनास मा.खा. प्रितमताई मुंडे,आ. संदिपभैय्या क्षिरसागर, आ. तान्हाजीराव मुटकुळे,नगराध्यक्ष पोलिसमित्र दादासाहेब गायकवाड, मा. सचिन मुळूक, डॉ. भारतभूषण क्षिरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हस्के, मा. अनिलदादा जगताप इ. मान्यवरांनी उद्घाटन साहेळा व समारोप सोहळयास उपस्थिती देवून अधिवेशनाची शोभा वाढविली अधिवेशनातील संघटनेच्या मागण्या सोडविण्याकामी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. संघटनेच्या वतीने तयार करण्यात आलेली **''बिंदूसरा''** स्मरणिकेचे सर्वांनी अतिशय कौतुक केले. या स्मरणिकेस जाहिरातीच्या रुपाने हातभार लावणा-या सर्व संस्थाचालक, जिल्हा संघटना यांचेही आभार मानण्यात आले. त्याचबरोबर अधिवेशनास निधी देणारे बीड जिल्हयातील शासनमान्य संस्था व त्यांचे संस्थाचालक व प्राचार्य यांचे आभार मानून शेवटी राष्ट्रगीत होवून अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन**
**शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई**